मराठी न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# UNCLOG Chakan MIDC साठी आमदार लांडगे ‘ऑन फिल्ड’

## हिंजवडीप्रमाणे चाकण औद्योगिकपट्टा समस्यामुक्तीचा संकल्प; औद्योगिक कंपन्या, संघटनांच्या प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक



**पिंपरी | प्रतिनिधी**

चाकण औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक कोंडी आणि पायाभूत सोयी-सुविधांच्या समस्यांमुळे औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या आणि कर्मचारी यांसह वाहनचालक अक्षरश: हैराण झाले आहेत. औद्योगिक क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी राज्य सरकार आणि स्थानिक शासकीय अस्थापनांमध्ये सक्षम समन्वयाची आवश्यकता आहे. त्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये बैठक घेण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल, असे आश्वासन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिले.

चाकण औद्योगिक पट्ट्यात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. यावर राज्य सरकारकडे दाद मागण्यासाठी औद्योगिक कंपन्यांचे प्रतिनिधी संघटनांनी “UNCLOG CHAKAN MIDC” ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहीमेला आमदार लांडगे यांनी पाठिंबा दिला आहे.

दरम्यान, संघटनांचे प्रतिनिधी आणि आमदार लांडगे यांची बैठक घेण्यात आली. यावेळी चाकण इंडस्ट्रिअल फेडरेशनचे सीईओ दिलीप बटवाल, चाकण इंडस्ट्रिअल असोसिएशनचे जीएम सुधीर मित्तल, चाकण एमआयडीसी इंडस्ट्रिअल असोसिएशनचे संस्थापक जयदेव अक्कलकोटे, अतुल इनामदार, ट्रॅफिकमुक्त चाकण कृती समितीचे प्रशांत टोपे, श्रीरंग कुलकर्णी, विनोद पाटील, रुपेश भंडारे, मनोजकुमार गायकवाड, विनोद पवार, राजेश जेजुरकर, अतुल शिंदे, अविनाश गोसावी, विजय पाटील, कुणाल कड, प्रमोद शिंदे, प्रसाद हरमन, प्रतिक जाधव, विनायक अलवेकर, नितीन जिवाडे आदी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, चाकण औद्योगिक क्षेत्र समस्यामुक्त करण्यासाठी सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहोत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबत औद्योगिक कंपन्यांचे शिष्टमंडळ घेवून हिंजवडी आयटी पार्क समस्यामुक्तीसाठी ज्या प्रमाणे बैठक घेतली आणि कामाला गती दिली. त्याचप्रमाणे चाकण औद्योगिक पट्टा समस्यामुक्त करण्यासाठी पुढाकार घेणार आहे.

### बैठकीतील प्रमुख मुद्दे :

» मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबत बैठक नियोजित करणे.
» भूसंपादन आणि रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न मार्गी लावले. त्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत पाठपुरावा.
» एमआयडीसी आणि चाकण औद्योगिक पट्ट्यातील रस्त्यांना अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटवणे.
» स्पायसर चौक : भूसंपादन झाले आहे. मात्र, रस्त्याचे काम आणि चौक प्रशस्त करणे.
» MIDC ते फेज-2, साडुंबारे, खालींबरे, मिसिंग लिंक्स काम पूर्ण करणे.
» कॉर्निंग कंपनी ते पुणे-नाशिक महामार्गाच्या कामाला गती देणे.
» प्रस्तावित रस्त्यांची यादी तयार करणे आणि पाठपुरावा नियोजन करावे. रस्त्यावरील खड्डे बुजवणे.
» अवजड वाहनांसाठी पार्किंग सुविधा करावी. वाहतूक कोंडीच्या ठिकाणी ‘रेड स्पॉट’ निश्चित करणे. त्यावर कार्यवाहीचा ‘अ‍ॅक्शन प्लॅन’ करावा.
» हिंजवडी आयटी पार्कप्रमाणे चाकण एमआयडीसीठी “सिंगल पॉईंट अ‍ॅथॉरिटी” निश्चित करणे.
» रस्त्यांना अडथळा ठरणारे MSEB चे पोल हटवण्यासाठी नियोजन करणे.

# हिंजवडीतून आयटी पार्क बाहेर चाललंय..

## विकास कामांच्या आड जो येईल त्याच्या विरोधात गुन्हे दाखल करा; अजितदादांचे प्रशासनाला आदेश



**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुन्हा एकदा हिंजवडीत पाहणी दौरा केला. यावेळी अनेक कामांच्या त्रुटी पाहता हिंजवडीच्या सरपंचासह अधिकाऱ्यांची चांगलीच शाळा घेतली. दरम्यान अद्यापही या कामांच्या मध्ये काही जण येत असल्याची तक्रार अधिकाऱ्यांनी पवारांकडे करताच कामामध्ये आडवे येणाऱ्या विरोधात गुन्हे दाखल करा असे आदेश दिले.

दोन आठवड्यापूर्वी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांचा पालन करत त्यांनी विकास कामांना सुरुवात केली की नाही याची पाहणी पवार यांनी सुरू केली आहे. देण्यात आलेल्या आदेशानंतर प्रशासन कामाला लागले आहे. हिंजवडीसह परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून कठोर पावले उचलली जात आहे. दरम्यान, आज पाहणी करताना अनेक गोष्टी पवारांच्या निर्दशनास आल्या. यावेळी काही अधिकाऱ्यांनी कामांच्या मध्ये काही जण आडवे येत असल्याची तक्रार केली. तर हिंजवडीचे सरपंच गणेश जांभुळकर कामात मंदिर जात असल्याबाबतची समस्या मांडली. यावेळी पवार भलचे संतापले.

**कोणीही मध्ये आलं तर त्यावर ३५३ टाका**

यावेळी पवारांनी मेट्रोच्या कामासोबत इतर समस्यांची पाहणी केली. रस्ते वाहतून कोंडी आणि इतर नागरी समस्यांबाबत ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. “आपलं असं ठरलंय कामाच्यामध्ये कोणी आला तर त्यावर ३५३ दाखल करा. तो कोणीही असेल तरी करा. अजित पवार जरी मध्ये आला तरी ३५३ दाखल करायचा. बाकीचं कोणाचं काय ठेवायचंच नाही. ३५३ लावायचा कारण त्याच्याशिवाय हे काम होणार नाही. नाही प्रत्येक जण माझं हे करा माझं ते करा असं करत राहिलं, आपल्याला संपूर्ण काम करून टाकायचं आहे”, असंही पुढे अजित पवारांनी म्हटलं आहे.

### ‘आपलं वाटोळं झालं..

» धरण बांधताना मंदिर जातातच ना. आपलं वाटोळं झालं आहे. आपली हिंजवडीची आयटी पार्क माझ्या पुण्याच्या बाहेर, महाराष्ट्राच्या बाहेर बंगळुरु, हैद्राबादला चाललंय. तुम्हाला काही पडलं नाहीय. मी का सकाळी सहा वाजता इथे येऊन बघतोयच त्यामुळेच बघतोयना.

**अनधिकृत बांधकामे पाडण्याचे आदेश**

काही दिवसांपूर्वी पवार यांनी हिंजवडीमधील समस्यांचा आढावा घेत बैठक घेतली होती. या बैठकीमध्ये त्यांनी सूचना करताना हिंजवडी परिसराचे सर्वेक्षण करुन अनधिकृत बांधकामे पाडण्याच्या सूचना केल्या होत्या. तसेच यावेळी त्यांनी कामे वेगाने करण्याचे निर्देशदेखील दिले होते.

# हिंजवडी आयटी पार्कमधील कोंडी फुटणार

## प्रायोगिक तत्त्वावर वाहतूक वळविणार, पोलीस आयुक्तांकडून आयटी पार्कची पाहणी

**पुणे | प्रतिनिधी**

राजीव गांधी आयटी पार्कमधील वाढती वाहतूक कोंडीची समस्या साडेविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी गुरुवारी हिंजवडीतील रस्त्यांची पाहणी केली. विरुद्ध दिशेने सुरू असलेल्या वाहतुकीच्या रस्त्यांवर सुरक्षा कठडे (बॅरिकेड्स) लावण्यात आले. तसेच, काही ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर महिनाभरासाठी वाहतूक वळवण्यात यावी, अशा सूचना पोलीस आयुक्त चौबे यांनी केल्या.



सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर आयुक्त सारंग आवाड, पुणे महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अपर आयुक्त दीपक सिंगला, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील, परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, वाकडचे सहायक पोलीस आयुक्त सुनील कुराडे, हिंजवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे, 'अनक्लॉग हिंजवडी आयटी पार्क' मोहिमेचे सचिन गुणाले, सचिन लोंढे तसेच महावितरण, पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमल) आणि एमआयडीसीचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

पोलीस आयुक्त चौबे आणि अधिकाऱ्यांनी आयटी पार्कमधील काही ठिकाणांची पाहणी करून उपाययोजना सुचवल्या. सातत्याने कोंडी होणाऱ्या रस्त्यांवर तसेच चौकांतील वाहतूक वळविण्यात यावी, काही ठिकाणी एकेरी वाहतूक करण्यात यावी. महिनाभर प्रायोगिक तत्त्वावर हे वाहतूक बदल करण्यात यावेत, अशा सूचना आयुक्त चौबे यांनी केल्या. हिंजवडी वाहतूक विभागाच्या कार्यालयापासून पाहणी सुरू केली. तेथील पुलाच्या सेवारस्त्यालगत असलेले महावितरण कंपनीचे रोहित्र (डीपी) हटविण्याबाबत सूचना केली. त्यामुळे सेवा रस्त्यावरील फ्री लेफ्ट अधिक सोयीचा होईल. जांभूळकर चौक, इंडियन आयल पेट्रोल पंप चौकातील सर्कल अर्धे करावे. शेल पेट्रोल पंप चौकातील विरुद्ध दिशेने येणारी वाहतूक बंद केली. माइंड ट्री कन्सल्टिंग चौक येथे वाहतूक उपाययोजनांचा आढावा घेतला. डॉलर कंपनीजवळील नाल्यावरील अतिक्रमण हटवण्याची सूचना केली. एमआयडीसी सर्कल येथे विरुद्ध दिशेने जाणारी वाहने थांबवण्यासाठीसुरक्षा कठडे लावले. मेगा पोलीस सर्कल येथे बससाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची सूचना केली. माण रस्त्यावरील टप्पा एकवरील पांडवनगरमधील काढलेल्या अतिक्रमणाची पाहणी केली. तेथील उर्वरित एक अतिक्रमण हटविण्याच्या सूचना केल्या.

अनक्लॉग हिंजवडी आयटी पार्क मोहिमेंतर्गत वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सह्यांची मोहीम राबविली. तसेच, उपाययोजना सूचविल्या आहेत. त्याचा ५७ पानी अहवाल हिंजवडी पोलीस ठाण्यात आयुक्त चौबे यांना देण्यात आला. कोणत्या ठिकाणी काय उपाययोजना कराव्यात याबाबतचे जिओ टॅगिंग केले आहे. त्यामुळे तीन ते चार महिन्यांत वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. काही ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर महिनाभरासाठी वाहतूक वळवण्यात येणार असल्याचे मोहिमेचे संयोजक सचिन लोंढे यांनी सांगितले.

# आपत्तीकालीन परिस्थितीसाठी अग्निशमन विभाग सज्ज

## अग्निशमन विभागाने प्रत्येक प्रभागनिहाय विशेष पूर नियंत्रण पथके कार्यरत केली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या आपत्तीकालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचा अग्निशमन विभाग सज्ज झाला आहे. अग्निशमन विभागाने प्रत्येक प्रभागनिहाय विशेष पूर नियंत्रण पथके कार्यरत केली आहेत. या पथकांची जबाबदारी पूरस्थितीत त्वरित मदत पुरवणे, नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करणे आणि परिसरातील बचावकार्य सुकर करणे, अशा स्वरूपाची असणार आहे.




महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडे बचाव कार्यासाठी पुरेशा प्रमाणात उपकरणे उपलब्ध आहेत. त्यामध्ये १० रबर बोट्स (IRB), २०० लाइफ जॅकेट्स, ४४ लाइफ रिंग्स, ५९ रोप्स, १० हुक्स, १३ पोर्टेबल पंप, वॉटर टेंडर, क्विक रिस्पॉन्स व्हेईकल, फायर फायटिंग मोटारसायकल, ४८ कार्यरत अग्निशमन वाहने, वायरलेस सेट्स, वॉकीटॉकी, मेगाफोन व टॉर्चेस यासारख्या आधुनिक साहित्यांचा समावेश आहे.

नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत संबंधित प्रभागीय कार्यालय अथवा अग्निशमन केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. जेणेकरून आपत्तीकालीन परिस्थितीमध्ये पथके त्वरित घटनास्थळी पोहोचतील. तसेच ज्या भागात पाणी शिरण्याचा धोका आहे, अशा भागांची यादी तयार करण्यात आली असून त्या भागात पथकांनी गस्त वाढवली आहे. आवश्यकतेनुसार १०० (पोलीस), १०१ (अग्निशमन), १०८ (आपत्कालीन मदत क्रमांक) या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

### अग्निशमन पथकांची कामे

पाणी भरलेल्या/साचलेल्या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत 10000 LPM क्षमतेचे डी-वॉटरिंग पंपाच्या साहाय्याने पाणी काढणे.

पूरस्थितीत नागरिकांना लाइफ जॅकेट, रबर बोट आणि रोपच्या मदतीने सुरक्षित स्थळी नेणे.

झाड पडल्यास चेन सॉ आणि इतर उपकरणांनी त्वरित मार्ग मोकळा करणे.

आपत्कालीन परिस्थितीत रेस्क्यू व्हेईकलद्वारे घटनास्थळी जलद पोहोचणे.

काही अपरिहार्य कारणास्तव विद्युत यंत्रणेमधील तांत्रिक बिघाड झाल्यामुळे विद्युत पुरवठ्यात गळती (शॉर्ट सर्किट) झाल्यास सदर ठिकाणी विद्युत विभाग/ महावितरण यांच्या मार्फत विद्युत पुरवठा सुरक्षिततेच्या कारणास्तव खंडित/पूर्ववत करणे.

नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करणे.

### पथकांची जबाबदारी व कामकाज

**» महापालिकेच्या पथकांमध्ये प्रशिक्षित कर्मचारी असून ते पूरग्रस्त भागांची ओळख, पाण्याची पातळी, वाहणाऱ्या पाण्याचा वेग आणि साचणाऱ्या ठिकाणांची माहिती ठेवतात. पथकांना स्थानिक परिसराचे अचूक ज्ञान आहे तसेच पथकातील सदस्यांना पोहण्याचे व रेस्क्यू तंत्राचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. तरी पूरस्थिती किंवा कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास घाबरून न जाता, चुकीच्या अफवांवर विश्वास न ठेवता महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकांची मदत घ्यावी. ही मदत पूर्णतः विनामूल्य उपलब्ध आहे, असेही अग्निशमन विभागाकडून कळवण्यात आले आहे.**

“ नागरिकांचा जीव आणि सुरक्षितता आमच्यासाठी सर्वोच्च प्राधान्य आहे. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या आपत्तीकालीन परिस्थितीत मदत करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्यासाठी प्रभागनिहाय नियुक्त केलेल्या पथकाकडे आवश्यक साधनसामग्री आणि प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध आहे. नागरिकांनी घाबरून न जाता आपत्ती व्यवस्थापन विभागाशी थेट संपर्क साधावा.

**– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# खेळाडू दत्तक योजनाच बेवारस, क्रीडा विभागाचा मनमानी कारभार

## क्रीडा विभागाकडून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य मिळवणा-या गुणवान खेळाडूना दत्तक योजनेतून आर्थिक सहाय्य आणि विविध लाभ दिले जातात

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकडून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य मिळवणा-या गुणवान खेळाडूना दत्तक योजनेतून आर्थिक सहाय्य आणि विविध लाभ दिले जातात. मात्र, प्रशासकीय राजवटीत या योजनेतून खेळाडूना लाभ मिळवून देण्यात आला नाही. त्यामुळे कित्येक वर्षांपासून ही योजना बंद असल्याने होतकरू, गुणी आणि गरजू खेळाडूंच्या कामगिरीवर परिणाम झाला आहे. पिंपरी-चिंचवड शहराची ओळख क्रीडानगरी म्हणून व्हावी, गुणवान आणि होतकरु खेळाडूना आर्थिक सहायक आणि विविध लाभ मिळावे, चांगल्या प्रशिक्षकाचे मार्गदर्शन मिळावे, याकरिता महापालिकेकडून दत्तक योजना सुरु केली होती.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे 13 वर्षांपूर्वी सुरू केलेली खेळाडू दत्तक योजना मागील कित्येक वर्षांपासून बंद आहे. ही योजना सुरू करण्याची वारंवार मागणी होऊनही या मागणीकडे दुर्लक्ष केले जात होते. त्यामुळे खेळाडूंमध्ये महापालिकेच्या क्रीडा विभागाच्या कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, खेळाच्या मैदानावर जिंकूनही महापालिकेच्या क्रीडा विभागाच्या गलथान कारभाराने पराभव झाल्याची भावना खेळाडूंमध्ये झाली आहे. दरवर्षी अर्ज मागवतात. मात्र दत्तक योजना निवड समितीपर्यंत ते पाठवत नसल्याने निर्णय होत नाही. त्यामुळे खेळाडूंना आशेला लावून पदरी निराशा पडत आहे.

महापालिकेने खेळाडू दत्तक योजनेसाठी गतवर्षी अर्जही मागविले. त्यास राज्यस्तरीय खेळाडूंसह राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये खेळलेल्या शहरातील खेळाडूंनी प्रतिसाद दिला. मात्र क्रीडा विभागातील काही कर्मचाऱ्यांनी खेळाडूंमध्ये भेदभाव करणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांना चुकीचा अहवाल सादर करणे, अधिकाऱ्यांकडून अहवालाची शाहनिशा न करता कार्यवाही होणे आणि योजना बंद करण्याची कारणे न सांगता पात्र खेळाडूंना लाभापासून वंचित ठेवल्याचा आरोप होवू लागला आहे.




### अर्ज केलेल्या खेळाडूंना अद्याप लाभ नाही

» २०२२-२३ मध्ये वर्षी क्रीडा विभागाने खेळाडू दत्तक योजनेसाठी अर्ज मागविले होते. ४७ खेळाडूंनी अर्ज केले. अर्ज करून अडीच वर्ष होऊनही खेळाडूंना लाभ दिला नाही, त्यामुळे क्रीडा विभागाचे अधिकारी, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त फक्त खेळाडूंना आशेला लावून कागदी घोडे नाचवत आहेत. लाभ मिळावा, यासाठी शहरातील खेळाडू व संघटनांनी पत्रव्यवहार केला. क्रीडा धोरण समितीच्या बैठकातही हा विषय मांडण्यात आला. मात्र, केवळ आश्वासना पलीकडे कोणतीही कार्यवाही होत नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाच्या कारभारावर खेळाडूंमधून प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे.

### काय आहे खेळाडू दत्तक योजना

» महापालिका हद्दीत किमान 3 वर्षे रहिवासी असलेल्या खेळाडूंसाठी ही योजना आहे. महापालिका शाळा, खासगी शालेय विद्यार्थी आणि अन्य खेळाडूंना प्रवेश आहे. मैदानी खेळ, हॉकी, कबड्डी, कुस्ती, बॉक्सिंग, नेमबाजी, खो-खो, लॉन टेनिस, बॅडमिंटन, जलतरण, रोलर स्केटिंग आणि क्रिकेट या खेळात शासकीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतून राष्ट्रीय शालेय, विद्यालयीन आणि इतर राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना अर्ज करता येतात. खेळाडूंना पीएमपीएमएल बस प्रवास मोफत, सकस आहार, दूध अथवा ठराविक आहारभत्ता आणि मागणीनुसार खेळाचे साहित्य, गणवेश देण्यात येतात. लाभार्थींनी राज्य, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभाग किंवा प्राविण्य मिळविल्यास त्यांना स्वतंत्र अर्जाव्दारे क्रीडा शिष्यवृत्ती किंवा आर्थिक सहाय्य देण्यात येते. पात्र खेळाडूंना फिजिओथेरपी, मानसोपचार आणि क्रीडा वैद्यक आदी सुविधा देण्यात येतात.

"खेळाडू दत्तक योजनेसाठी २०२२-२३ मधील मागविलेले अर्जात ४७ खेळाडूचे पात्र ठरले आहेत. यामधील एकाही खेळाडूंना अद्याप लाभ दिलेला नाही. मात्र, लाभ देण्याची प्रक्रिया सुरू आहे. यंदाही दि. 1 ते 14 ऑगस्ट या कालावधीत खेळाडूंकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. आलेल्या अर्जाची छाननी करून खेळाडूंना लाभ देण्यासाठी प्रयत्न केले जातील."

- पकंज पाटील, उपआयुक्त, क्रीडा विभाग, महानगरपालिका.

# पीएमआरडीएमध्ये 'ग्रोथ हब'ला चालना; यशदा संस्थेच्या वतीने होणार नियोजन

## तंत्रज्ञान, उत्पादन, शिक्षण आणि हरित गतिशीलतेमध्ये आघाडीवर यामुळे पुणे ग्रोथ हब म्हणून विकसित होईल, असा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र (पीएमआरडीए) ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याची राज्य शासनाची तयारी सुरू झाली आहे. विकास आराखडा रद्द झाल्यानंतर आता जिल्ह्याचा एकूण विकास व्हावा, या उद्देशाने नियोजन करण्यात आले आहे.

ग्रोथ हब बनविण्यासाठी यशदा नियोजनाचा आराखडा तयार करणार आहे. याबाबत पहिली प्राथमिक बैठक संपन्न झाली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक होणार आहे. या आराखड्याची अंमलबजावणी महापालिका, पीएमआरडीए यांच्यासह अन्य शासकीय यंत्रणा काम करणार आहे.

पुणे महानगर प्रदेश हे तंत्रज्ञान, उत्पादन, शिक्षण आणि हरित गतिशीलतेमध्ये आघाडीवर आहे. यामुळे पुणे ग्रोथ हब म्हणून विकसित होईल, असा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला. मंत्रालयात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

जिल्ह्यामध्ये आयटी कंपन्या, कारखाने, मेट्रो, रिंगरोड, औद्योगिक कॉरिडॉर्स आणि जागतिक दर्जाच्या शैक्षणिक सुविधा असल्याने यशदा ही शासकीय संस्था आर्थिक वाढीचे धोरण आणि नियोजन आराखडा तयार करणार आहे. कामाबाबतचे निरीक्षण विभागीय आयुक्त करणार आहेत. तर, त्याबाबतचा निधी हा पीएमआरडीएकडून उपलब्ध होणार आहे. त्यासाठी अंदाजित खर्च हा आठ कोटी असेल

केंद्र सरकारच्या 2024 च्या अर्थसंकल्पात 14 ग्रोथ हब शहरांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये पुणे, नागपूर, नाशिकचा समावेश आहे. पुण्यात आयटी, मेट्रो, रिंगरोड, औद्योगिक कॉरिडोर्स, शैक्षणिक सुविधा आणि दवाखान्यांमुळे ग्रोथ हबसाठी आदर्श वातावरण आहे. पुण्याचे सकल उत्पन्न 4.2 लाख कोटी असून 2030 पर्यंत 15-18 लाख नोकऱ्या निर्माण होणार आहेत. यामध्ये 6 लाख महिला कामगार असतील.




### आर्थिक उन्नतीवर भर

» प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत असलेल्या तालुक्यांमध्ये आर्थिक उन्नती कशी होईल, याबाबत एक प्लॅन तयार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी लागू करण्यात आलेल्या निधीबाबत अधिक चांगल्या प्रकारे आणि कशाप्रकारे काम करता येईल, याबाबत अभ्यास होणार आहे. त्यासाठी यशदा ही स्वतंत्र एजन्सी नेमणूक करणार आहेत. त्याबाबत माहिती आणि अभ्यास केल्यानंतर तो यशदा संस्थेच्यामार्फत अंतिम केला जाईल. तर, त्यावरती होणारा खर्च हा पीएमआरडीए उचलणार आहे.

# रहदारीचा चिखल; विकलेल्या जागेवरील अडवला रस्ता

## रोजच्या त्रासाला कंटाळून स्थानिक नागरिकांनी स्वत:च्या खिशातून पैसे काढून सिमेंट क्रॉंक्रीटचा रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला

**पुणे | प्रतिनिधी**

बाणेरच्या सर्व्हे नं. ३१, २-बी या भागातील नागरिकांना कच्च्या रस्त्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. पावसामुळे रस्त्यावर चिखल झाला असून, त्यातून नागरिकांना मार्ग काढावा लागत आहे. या रोजच्या त्रासाला कंटाळून स्थानिक नागरिकांनी स्वत:च्या खिशातून पैसे काढून सिमेंट क्रॉंक्रीटचा रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पैसेसुद्धा गोळा केले, त्यानुसार काम सुरू केले जाणार होते. परंतु, मूळ मालकाने दमदाटी करत या रस्त्याचे काम बंद पाडल्याचा प्रकार समोर आला आहे.

पुणे शहरासह उपनगर भागात जमिनीचे छोटे-मोठे प्लॉट पाडून जमिनीची विक्री केली जाते. प्लॉटिंगसाठी रस्ता, पाणी, वीज, बाग, हॉस्पिटल आणि जवळच शाळा अशा स्वरुपाच्या जाहिराती केल्या जातात. आपल्या बजेटमध्ये जागा मिळते म्हणून आयुष्यभराची कमाई लावून जागा खरेदी केली जाते.

मूळ मालकांकडून एकदा जागेची विक्री केली की, त्यांना विविध सेवा देणार असल्याचा विसर पडतो. असाच प्रकार सर्व्हे नं. ३१, २ बी मधील मूळ मालकाला पडला आहे. आनंद मोहिते आणि त्यांच्या नातेवाईकांनी अशाच प्रकारे जमिनीचे तुकडे करून विक्री केली आहे. १९८८ साली ३३ जणांनी मूळ मालकांकडून जमिनीची खरेदी घेतली आहे. या खरेदीखतामध्ये ६ मीटरचा रस्ता वहिवाटीसाठी दिला असल्याचे मान्य केले आहे. त्यानुसार हा रस्ता नागरिकांच्या वापरात आहे.

मूळ मालकाने एकदा जमिनीची विक्री केल्यानंतर, त्याचा संबंध संपुष्टात येतो. परंतु, प्लॉटिंग करताना रस्त्यासाठी दिलेल्या जागेचा मोबदला मिळाला नाही, त्यामुळे डांबरीकरण अथवा सिमेंट क्रॉंक्रिटीकरण करायचे नाही, असा पवित्रा घेत मूळ मालक मोहिते यांनी रस्त्याच्या कामाला विरोध केला असल्याचे येथील स्थानिक नागरिकांनी सांगितले.



### कारवाई करण्याची मागणी

» मुलांना जाताना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे रस्ता करू द्या, तुमचा महापालिकेचा काही वाद असल्यास तो तुम्ही मिटवून घ्या, आम्हाला त्रास देऊ नका, अशा शब्दांत स्थानिक नागरिकांनी त्यांची समजूत काढली. परंतु त्यांनी ऐकले नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी बाणेर पोलीस ठाण्यात धाव घेतली. नागरिकांच्या तक्रारीनंतर न्यायालयाच्या आदेशाची प्रत घेऊन येतो, असे सांगून मूळ मालकाने तीन दिवसांची मुदत पोलिसांकडून घेतली आहे. त्यामुळे आता रस्त्याचे काम पुन्हा थांबले असल्याचे नागरिकांनी सांगितले. दरम्यान, प्लॉटिंग करताना, तसेच जमिनीचे खरेदीखत देताना रस्ता लिहून दिल्यानंतरही मूळ मालकाने असा वाद घालणे योग्य नसल्याचे नागरिकांचे म्हणणे असून, अशा मालकांवर योग्य कारवाई करण्याचीही मागणी केली आहे.

> ६ मीटरचा असलेल्या रस्त्यामध्ये आमची २२ गुंठे जागा जात आहे. याचा मोबदला पुणे महापालिकेने टीडीआर स्वरुपात दिला पाहिजे, अशी आमची मागणी आहे. या प्रकरणी न्यायालयात वाददेखील सुरू आहे. हा रस्ता वहिवाटीसाठी दिला आहे. नागरिकांना रस्ता वापरण्यास कोणताही विरोध नाही. परंतु, डांबरीकरण किंवा सिमेंट क्रॉंक्रिटीकरण करू नये, म्हणून विरोध केला आहे. एकदा रस्ता झाल्यानंतर, आम्हाला मोबदला मिळणार नाही. यापूर्वी आमच्या एका प्लॉटमधील रस्त्याचे डांबरीकरण केल्यानंतर महापालिकेने मोबदला देण्यास नकार दिला. त्यामुळे आमचे नुकसान करू नये, अशी विनंती येथील नागरिकांना केली आहे.
>
> **- आनंद मोहिते, मूळ मालक**

> सर्व्हे नं. ३१, २ बी, बाणेर या भागातील नागरिकांना सिमेंट क्रॉंकीटचा रस्ता तयार करण्यास मूळ मालकाने विरोध केला आहे. त्याला शासनाकडून मोबदला मिळाला नसल्याचे म्हणणे आहे. तसेच, याप्रकरणी न्यायालयीन वाद सुरू असल्याचे सांगितले आहे. न्यायालयाच्या आदेशाची प्रत सादर करण्यासाठी मूळ मालकाने तीन दिवसांची वेळ घेतली आहे.
>
> **- चंद्रशेखर सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बाणेर पोलीस ठाणे.**

# पुरंदर विमानतळाबाबत अजित पवारांनी दिली महत्वाची माहिती

## पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील सर्किट हाऊस येथे पुरंदर विमानतळाबाबत महत्वाची माहिती दिली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळाचा भूसंपादनाचा तिढा सुटला असला तरी काही शेतकऱ्यांचा जमिनी देण्यास विरोध कायम आहे. या पार्श्वभूमीवर आता राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील सर्किट हाऊस येथे पुरंदर विमानतळाबाबत महत्वाची माहिती दिली आहे.

विमानतळास जमिनी देण्यास विरोध दर्शविणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन त्यांना इतर ठिकाणी शेतीवाडी करता येईल, त्यासाठी त्यांचे त्याच भागात पुनर्वसन केले जाईल, अशी ग्वाही अजित पवार यांनी दिली. विमानतळ करण्यासाठी अनेक जागा पाहिल्या. मात्र, पुरंदर तालुक्यातील सासवडजवळील जागा विमानतळासाठी योग्य ठरली.

पुरंदर विमानतळासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत, त्यांना विश्वासात घेऊन तेथे विमानतळ करायचा, असे मंत्रिमंडळाने ठरविले आहे. सध्याचे पुण्याचा विमानतळ संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील आहे. त्यामुळे पुण्याला दोन धावपट्ट्या करण्याची गरज आहे. सध्या जेवढे क्षेत्र घेत आहोत, त्यात एकही गाव जात नाही. पूर्वी संपादित करण्यात येणाऱ्या गावांपैकी काही क्षेत्र कमी केले आहे, अशी माहिती अजित पवार यांनी यावेळी बोलताना दिली. त्यानुसार कॅर्गो, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळाची गरज आहे तेथील शेतकऱ्यांचा विरोध आहे, त्यांना नाराज न करता विश्वासात घेऊन विमानतळ करण्याची सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरंदर विमानतळाच्या पॅकेजबाबत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर दिले. यावेळी पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी हे देखील तिथे उपस्थित होते.

पुरंदर विमातळाबाबत अनेक तर्क वितर्क लावण्यात येत आहेत. यावर भाष्य करताना पुरंदरमधील शेतकरी हे आमचेच लोक आहेत. कृपा करून गैरसमज घेऊ नका, गैर अर्थ काढ नका, असे आवाहन अजित पवार यांनी केले आहे.




### नेमकं काय म्हणाले अजित पवार?

» ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत, त्यांना विश्वासात घेऊन तेथे विमानतळ करायचा, असे मंत्रिमंडळाने ठरविले आहे. सध्याचे पुण्याचा विमानतळ संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील आहे. त्यामुळे पुण्याला दोन धावपट्ट्या करण्याची गरज आहे. त्यानुसार कॅर्गो, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळाची गरज आहे. सध्या जेवढे क्षेत्र घेत आहोत, त्यात एकही गाव जात नाही. पूर्वी संपादित करण्यात येणाऱ्या गावांपैकी काही क्षेत्र कमी केले आहे, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.